7 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानाधिष्ठित चर्चा व्हायला हवी



## विद्यापीठातील कार्यशाळेत कुलगुरूंची अपेक्षा

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'विद्यापीठातील सर्व अधिकार मंडळे, सभागृहे शैक्षणिक स्वरूपाची आहेत, हा महत्त्वाचा संकेत ध्यानी ठेवून या सभागृहांमध्ये ज्ञानाधिष्ठित चर्चा व्हावी, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली. 'अधिकार मंडळांची कार्यपद्धती' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६ नुसार नव्याने अस्तित्वात आलेल्या अधिसभा, विद्यापरिषद आणि व्यवस्थापन परिषद यांसह विविध अधिकार मंडळांच्या सदस्यांना अधिनियम, परिनियम, विविध अधिकार, नियम, संकेत आदींविषयी अवगत करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात 'अधिकार मंडळांची कार्यपद्धती' या विषयावर कार्यशाळा वि. स. खांडेकर सभागृहात झाली. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठ कायदा विद्यार्थीकेंद्री असून संशोधनास चालना, उद्योगांसमवेत सहकार्यवृद्धी आणि सामाजिक जबाबदारीचे भान अधोरेखित करणारा आहे. या चतुःसूत्रीच्या आधारे क्षमता संवर्धन करण्याच्या दृष्टीने सर्वच अधिकार मंडळांनी कार्य करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी कायदा आणि उपरोक्त चार स्तंभांच्या आधारे व्यवस्था समजून घेण्याची मानसिकता निर्माण व्हायला हवी. त्याद्वारे कायदा जाणीवपूर्वक समजून घ्या आणि आपल्या सहकाऱ्यांनाही समजून सांगा.'

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठाच्या अधिकार मंडळांवर विविध क्षेत्रांतील गुणवंत, अनुभवी व ज्ञानी सदस्यांचा समावेश आहे. त्यांची निवड गुणवत्ता व क्षमतेच्या बळावरच झालेली आहे, याचे भान सदस्यांनी जपणे गरजेचे आहे. या सदस्यांनी शैक्षणिक बाबींसंदर्भात प्र-कुलगुरूंशी, प्रशासकीय बाबींसंदर्भात कुलसचिवांशी, परीक्षाविषयक बाबींसाठी परीक्षा व मूल्यमापन संचालकांशी तसेच वित्तविषयक बाबींच्या माहितीसाठी वित्त व लेखाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यास प्राधान्य द्यावे. विद्यापीठाच्या या सर्व अधिकाऱ्यांशी अधिकार मंडळ सदस्यांचा थेट संवाद प्रस्थापित होणे गरजेचे आहे. आपल्या सूचना, समस्या, प्रश्नांची मांडणी करणे जितके महत्त्वाचे, तितकेच त्यासाठीचा पाठपुरावाही महत्त्वाचा आहे. विद्यापीठीय अधिकार मंडळांच्या निर्मितीमागे कायद्याने विद्यार्थी व विद्यापीठ विकासाचे लक्ष्य बाळगले असून त्याच्या साफल्याच्या दृष्टीने अधिकार मंडळ सदस्यांनी कार्यरत राहायला हवे. असे क्षमताधिष्ठित सदस्य घडविणे, हाच या कार्यशाळेच्या आयोजनामागील प्रमुख हेतू आहे.'

व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे उपस्थित होते. कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी मान्यवरांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 APR 2018
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात आज एच. आर. मीटचे आयोजन

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेकनॉलॉजी यांच्या वतीने उद्या (ता. ७) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहामध्ये एच.आर. मीटचे आयोजन केले आहे. कार्यक्रमासाठी नामवंत कंपन्याचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून अभियांत्रिकी शिक्षणक्षेत्र आणि उद्योग जगत यामधील दुवा वृद्धिंगत करून विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीसाठी लागणारे मार्गदर्शन व चर्चासत्र आयोजित केले आहे. प्रत्येक हाताला काम आणि कामाचे योग्य दाम व त्या परिश्रमाद्वारे सुलभ जीवनमान कसे जगता येईल. झपाट्याने वाढणारे संगणकीकरण, आधुनिकीकरण व लोकसंख्या, त्यामुळे शहराकडे धाव घेणारे प्रचंड मनुष्यबळ, उपलब्ध कमी रोजगार व असे प्रचंड मनुष्यबळाचे व्यवस्थापन कसे करायचे. तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयातून उत्तीर्ण होणारे विद्याविभूषित युवक-युवती. यांच्या भावितव्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी व ट्रेनिंग आणी प्लेसमेंट समन्वयक डॉ. एस. बी. सादळे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 APR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आज चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या दि. ७ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहामध्ये एच. आर. मीट २०१८ चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी ३५ नामवंत कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून अभियांत्रिकी शिक्षणक्षेत्र आणि उद्योग जगत या मधील दुवा वृद्धिंगत करून विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीसाठी लागणारे मार्गदर्शन व चर्चा सत्र आयोजित केले आहे. टेक्निकल स्कीलस, कम्युनिकेशन स्कीलस, प्रोफेशनल एथिक्स या विषयांचे सखोल मार्गदर्शन उपस्थित

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात आज एचआर मिट

**कोल्हापूरः** शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यावतीने (ता. ७) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहामध्ये एच.आर.मिट २०१८ चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी ३५ नामवंत कंपन्याचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. अभियांत्रिकी शिक्षणक्षेत्र आणि उद्योग जगत या मधील दुवा वृद्धिंगत करून विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीसाठी लागणारे मार्गदर्शन व चर्चासत्र आयोजित केले आहे.